# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** नांदेड    **P.S.(ठाणे):** भोकर
**Year (वर्ष):** 2023
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0100
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/03/2023 21:16

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 22/02/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 22/02/2023
**Time From (वेळेपासून):** 13:15 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:00 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 24/03/2023    **Time (वेळ):** 21:09 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 034
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/03/2023 21:09 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**
**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी    **Beat No. (बिट क्र.):**
**(b) Address (पत्ता):** भोकर येथील ग्रामसेवक, यांचे कार्यालयात, ता भोकर जी नांदेड

**(c) In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** कामाजी एकनाथ गोरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1998

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No. (अ.क्र.)** | **ID Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)** |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Address Type (पत्त्याचा प्रकार)** | **Address (पत्ता)** |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | मौ रिठ्ठा, ता भोकर, , ता भोकर, ,भोकर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | मौ रिठ्ठा, ता भोकर, , ता भोकर, ,भोकर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8308318562

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहिती असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address (वर्तमान पत्ता)** |
|---|---|---|---|---|
| 1 | गंगाकिशन विठ्ठलराव एलैन्लोड | | | 1. [illegible] घर क्र 106,,[illegible] फरांदे पार्क, ,[illegible] जी नांदेड ,भाग्य नगर, नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनाक 24/03/2023
फिर्याद

मी कामाजी एकनाथ मोरे, वय 25 वर्षे व्यंवसाय शेती, रा. मौ. रिठ्ठा, ता. भोकर, जि. नांदेड, मो.न. 8308318562.

पोलीस स्टेशन भोकर येथे समक्ष हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन दिनांक 22/02/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथील पोलीस निरीक्षक श्रीमती धुतराज मॅडम हे त्यांचे स्टाफसह व दोन शासकीय पंचासह वन विभागाचे गार्डन, भोकर येथे येवून माझी व स्टाफ, पंचांची ओळख करून दिली. व मी माझी तक्रार पंचासमक्ष सांगितली की, माझे काका नागोराव व्यंकटराव मोरे यांनी त्यांचा मौ. रिठ्ठा येथील मालमत्ता क्र. 56 मधील 23 बाय 45 फुट असे एकुण 1035 चै.फुट हा वाटणी आधारे माझे नावावर करून दिलेला आहे. त्या बाबत माझे नावे सदरचा मालमत्ता ही नमूना नं. 8 वर नोंद घेण्यासाठी मी ग्रामसेवक श्री एनलोड यांच्याकडे कागदपत्रे तयार करून दिले होते. तेव्हा त्यांनी मला या कामासाठी 6500 रू. लागतील असे सांगितले होते. ग्रामसेवक श्री एनलोड यांनी मागितलेली रक्कम ही लाच असल्याने सदर लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक 22/02/2023 रोजी ला.प्र.वि नांदेडचे अधिकारी पोलिस निरीक्षक श्रीमती धुतराज मॅडम यांच्याकडे माझी तक्रार पंचा समक्ष सांगितली व माझे सांगण्यावरून त्यांनी माझी तक्रार लिहून घेतली. मी माझी तक्रार वाचून पाहिली ती बरोबर असल्याची खात्री करून सही केली. तसेच पंचांनी सदरची तक्रार वाचून माझे सांगण्याप्रमाणे असल्याची खात्री करून त्यावर सही केली व तसेच धूतराज मॅडम यांनी सूध्दा सही केली.

मी दिलेल्या तक्रारी वरून पोलीस निरीक्षक श्रीमती धुतराज मॅडम यांनी लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यांनतर त्या ठिकाणी पोकॉ/ईश्वर जाधव यांनी एक नवीन मेमरी कार्ड डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये टाकुन पोलीस निरीक्षक श्रीमती धुतराज मॅडम, माझे व दोन्ही पंचाचे परिचय दर्शक वक्तव्य रेकॉर्डींग करून घेतले.

त्यां नतर ग्रामसेवक श्री एनलोड यांची भेट घेवून लाच पडताळणी करणे कामी पोनि धुतराज मॅडम यांनी लाचमागणी पडताळणी अनुशंगाने मला व पंचाना योग्य त्या सुचना दिल्या. त्यांनतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून माझे गळयात दोरीच्या साहयाने आडकवून शर्टच्या आत मध्ये टाकुन माझ्या सोबत पंच क्र.1 श्री वनराज जाधव यांचे सह ग्रामसेवक श्री एनलोंड यांच्या कार्यालयात त्यांची भेट घेण्यासाठी माझे कडील मोटार सायकल क्रमांक एमएच 14 ए एफ 1452 वरून भोकर येथील वन विभागाच्या गार्डनवरून लाचमागणी पडताळणी कामी दुपारी सव्वा एक वाजता चे सुमारास शासकीय वाहण थांबलेले ठिकाण पासुन रवाना केले व सदर सापळा पथक हे सदर ठिकाणी थांबून राहिले.

त्यानंतर मी व पंच क्र. 1 ग्रामसेवक श्री एनलोड यांच्या कार्यालयात जावून त्यांची भेट घेण्याकरिता गेलो असता, ग्रामसेवक एनलोड हे त्याठिकाणी हजर नव्हते. त्यामुळे आम्ही थोडावेळ तेथंच लोकसेवक एनलोड हे येण्याची वाट पाहीली. तेंव्हा थोडयाच वेळात लोकसेवक एनलोड साहेब हे त्यांच्या ऑफीस मध्ये आले. तेंव्हा मी त्यांना माझेजवळील कागदपत्रे दाखविली. त्यांनी कागदपत्रे पाहिली. त्यानंतर ग्रामसेवक श्री एनलोड यांनी मला हाताच्या इशा-याने पैशाची मागणी केली. तेव्हा मी त्यांना सांगितले आणतो की, सर तब्येत बराबर नव्हती. आलो नाही ईतके दिवस आणि कागदपत्रे पहा असे म्हणालो असता, ग्रामसेवक श्री एनलोड यांनी मीच लिहून दिलो की रे बापू..... चुकली तर बोलवीतो की तुला...... 8 नंबर चा फॉर्म बघा ते असे म्हणाले. त्यानंतर ग्रामसेवक श्री एनलोड यांनी उदयाच ये असे म्हणाले व हाताचे ईशा-याने पैशाची मागणी केली तेव्हा मी त्यांना आणतो की सर, कीती आणायचे सर, माझे आईची तब्येत थोडी ठिक नाही. तेव्हा ग्रामसेवक श्री एनलोड यांनी मला म्हणाले, बोलले की, मी तुला पावती बी देतो पावत्या बनवल्या तर पंधरा, सोळा हजार रूपये लागतील, पाच हजार रूपयात मी तुला देतो असे म्हणाले, मी त्यांना परत किती देवू साहेब सांगा की, तेव्हा ग्रामसेवक श्री एनलोड म्हणाले की, पंधरा चे सहा केलो कि रे मी तुला, बर सगळ्या देखत मला बोलाय लावू नको बर तु, असे म्हणाले. तेव्हा ग्रामसेवक श्री एनलोड हे गाडीवर



Scanned with CamScanner

जात होते तेव्हा मी ग्रामसेवक श्री एनलोड यांना विचारले की पाच घेवून येवू का सर, तेव्हा ग्रामसेवक एनलोड यांनी हो असा होकार देवून माझेकडे लाचेची मागणी करून निघून गेले. त्यानंतर मी व पंच क्र.1 हे भोकर येथील वन विभागाच्या गार्डन येथे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी दोन वाजण्याचे सुमारास परत आलोत. तेव्हा जाधव सरांनी माझ्या गळयातील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केले. पोलीस निरीक्षक श्रीमती धुतराज मॅडम यांनी पंच क्र.1 श्री वनराज जाधव व माझ्या कडून लाचमागणी पडताळणी दरम्याण घडलेल्या हकीकतची माहिती घेतली व त्या नतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषन ऐकले व सदर लाचमागणी पडताळणी दरम्याण ग्रामसेवक श्री एनलोड यांनी पंच क्र.1 वनराज जाधव यांच्यासमक्ष पाच हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले म्हणुन ग्रामसेवक श्री एनलोड यांच्यावर दि. 23/02/2023 रोजी सापळा कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला.

दि. 23/02/23 रोजी पुन्हा ला.प्र.वि. पथक कडून सापळा कार्यवाही करण्यात आली परंतू त्यादिवशी ग्रामसेवक श्री एनलोड साहेब हे मिटींगमध्ये असल्याने त्यांची व माझी भेट झाली नाही. त्यानंतर दि. 24/02/23 रोजी सापळा कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतू दि. 24/02/23 रोजी ग्रामसेवक श्री एनलोड साहेब हे त्यांचे कार्यालयात आले नसल्याने त्यांची भेट झाली नाही. माझे मोबाईल वरून ग्रामसेवक श्री एनलोड यांना त्यांचे मोबाईलवर कॉल केला असता, त्यांचा फोन स्विच ऑफ होता. दि. 27/02/23 व दि. 28/02/23 रोजी ग्रामसेवक श्री एनलोड साहेब हे कार्यालयात नसल्याने त्यांची भेट झाली नाही.

त्यानंतर दि. 16/03/2023 रोजी ला.प्र.वि. पथक हे सापळा कार्यवाही साठी भोकर येथे आले व माझेशी संपर्क केला. तेव्हा मी त्यांना जावून भेटलो व ग्रामसेवक श्री एनलोड साहेबांना माझेवर संशय आल्याने त्यांनी आमच्या गावचे सरपंच बाई करंडे यांचे पती परसराम करंडे यांच्या हाती माझे काका नागोराव मोरे यांच्याकडे माझा नमूना नं 8 व 383 रूपयाची कर वसूली पावती पाठवून दिल्याचे सांगितले. तेव्हा मला पोनि धुतराज मॅडम यांनी ग्रामसेवक श्री एनलोड यांची भेट होईल का याबाबत विचारपुस केली, तेव्हा मी त्यांना सांगितले की, मागील दोन दिवसा पासून संप चालू असून ग्रामसेवक श्री एनलोड यांचे कार्यालय बंद होते. संप संपल्या नंतर ते मला भेटतील असे सांगितले.

त्यानंतर आज दि. 24/03/23 रोजी मी पोनि धुतराज मॅडम यांना फोनवर ग्रामसेवक श्री एनलोड साहेब हे भोकर येथे त्यांच्या कार्यालयात आलेले असल्या बाबत कळविल्याने धुतराज मॅडम व हे त्याचे पथकासह आज दि. 24/03/23 रोजी दुपारी दीड वाजण्याचे सुमारास भोकर येथील रेल्वे स्टेशन परिसरात त्यांचे स्टाफसह आल्या. त्यानंतर पोनि धुतराज मॅडम यांनी त्यांचे पथकातील पोलीस अंमलदार यांची ओळख करून दिली. शासकीय वाहनात सापळा पुर्व कार्यवाही करण्यात आली. शासकीय वाहनात पोकॉ/अरशद खान यांनी दोन पंच व मला अँन्थ्रॅासिन पावडरचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले तसेच सापळा कार्यवाही अनुशंगाने पोलीस निरीक्षक धुतराज मॅडम यांनी सर्व सापळा पथकास, मला व पंचाना सविस्तर सुचना दिल्या. तसेच सापळा कार्यवाही दरम्यान सापळा पथकातील सदस्यांनी कोणी काय करावे याबाबत प्रत्येकाची जबाबदारी निश्चीत केली. तसेच मी सापळा कार्यवाही कामी जमा केलेल्या 5000/- रूपयाच्या रक्कमेत ज्यात 2000 रू दराची एक चलनी नोट, 500/- रू. दराच्या 5 चलनी नोटा, 200/- रू दराच्या 2 चलनी नोटा व 100/- रू दराची एक चलनी नोट ज्यांचे क्रमांक पंच क्रमांक दोन यांनी पुर्वी नोंदविलेले नंबरची खात्री केली. त्यानंतर सदरील नोटांना पंचासमक्ष पोकॉ/अरशद खान यांनी अॅन्थ्रासिन पावडर लावुन सदरील नोटा पंचासमक्ष माझ्या पॅन्टच्या डाव्या बाजुच्या खिशात काही नसल्याची खात्री करून त्याठिकाणी ठेवल्या. त्यानंतर पोनि श्रीमती धुतराज मॅडम यांनी मला ग्रामसेवक श्री एनलोड यांनी माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर माझे पॅन्टच्या खिश्यातील रूमाल काढून तोंड पुसून हातात ठेवणे बाबतचा ईशारा करण्यास समजावुन सांगीतले.

त्यानंतर सव्वा दोन वाजण्याचे सुमारास जाधव सरांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून माझे गळयात दोरीच्या साह्याने शर्टच्या आतमध्ये टाकुन दिले. त्यानंतर मी व पंच क्र.1 वनराज जाधव असे आम्ही दोघेजन पायी ग्रामसेवक श्री एनलोड यांच्या कार्यालयाकडे रवाना झालो. तसेच आमचे पाठोपाठ सापळा पथक हे सुरक्षित अंतर ठेवून आमच्यावर नजर ठेवून ग्रामसेवक श्री एनलोड यांच्या कार्यालया जवळपास थांबले . त्यानंतर मी ग्रामसेवक श्री एनलोड यांचे कार्यालयाकडे जात असतांना मला ग्रामसेवक श्री एनलोड साहेब हे आमच्या गावचे सरपंच बाई करंडे यांचे पती परसराम करंडे यांच्यासह बाहेरच भेटले. तेव्हा मी माझे जवळील नमूना नं. 8 व त्यांनी दिलेली 383 रूपयाची कर पावती दाखवून तुम्ही सगळं दिल्या मला, काही बोलल्या नाही, तेव्हा श्री ऐनलोड हे काय बोलू, मी थोड जावुन ,सरपंचाकडे काय झाल. म्हणून बोलण्यास टाळाटाळ केली. तेव्हा मी त्यांना पावती बाबत विचारले असता, तेव्हा सरपंच करंडे म्हणाले की, जेवढी आहे तेवढी घेतली की. तेव्हा मी पावती वाढवून पाहीजे होती असे म्हणाले तेव्हा आमच्या गावचे सरपंच बाई करंडे यांचे पती परसराम करंडे यांनी, वाढून कशी भेटते, असे म्हणाले ग्रामसेवक श्री एनलोड यांना माझेवर संशय आल्याने ते मला बोलण्यास टाळाटाळ करून माझेकडुन पैशे न घेता निघून गेले. तेव्हा त्याठिकाणी जवळच सापळा रचून असलेले पोलीस निरीक्षक श्रीमती धुतराज मॅडम व त्यांचे



Scanned with CamScanner

साफळा पथकातील लोक त्याठिकाणी आले व त्यांनी मला ग्रामसेवक श्री एनलोड याच्याशी काय बोलणे झाले याबावत विचारणा केली, तेव्हा मी त्यांना ग्रामसेवक श्री एनलोड हे मला जास्त काही बोलले नाही, त्यांना माझेवर संशय आला असून ते माझे कडून पैशे घेणार नाहीत असे कळविले. त्यावरून श्रीमती धुतराज मॅडम यांनी व त्यांचे सोबत स्टाफने माझे कडील डिजीटल व्हाईस रेकार्डर घेवून ते बाजूला जावून ऐकून खात्री केली. त्यानंतर पोनि धुतराज मॅडम यांनी व त्यांचे पथकाने ग्रामसेवक श्री एनलोड यांना ताब्यात घेवून त्यांचे कार्यालयात घेवून आले व ग्रामसेवक श्री एनलोड यांना माझे कामाविशयी विचारणा केली असता, ग्रामसेवक श्री एनलोड यांनी माझेकडे कान्नाजी मोरे यांचे काम प्रलंबीत होते ते मी करून दिले आहे असे सांगितले. तसेच पोनि धुतराज मॅडम यांनी ग्रामसेवक श्री एनलोड यांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव गंगाकिशन विठ्ठलराव एॅन्लोड असे सांगितले. त्यानंतर ग्रामसेवक श्री एॅन्लोड यांना पोलीस स्टेशन भोकर येथे पुढील कार्यवाही साठी घेवून गेले

माझे काका नागोराव व्यंकटराव मोरे यांनी मला वाटणी पत्रा आधारे दिलेला मौ रिठ्ठा येथील मालमत्ता क्र 56 चा प्लॉट माझे नावाने नमूना नं 8 वर नोंद घेण्यासाठी दि 22/02/2023 रोजी ग्रामसेवक श्री गंगाकिशन विठ्ठलराव एॅन्लोड ग्रामसेवक ग्रा पं कार्यालय रिठ्ठा रा फरांदे पार्क, बी विंग, घर क्र 106, नांदेड यांनी पंचासमक्ष मला पाच हजार रूपये लाचेची मागणी करून आज रोजी माझेवर संशय आल्याने माझेकडून लाचेचे पैशे स्विकारले नाही म्हणुन माझी त्यांच्या विरूध्द कायदेशिर तक्रार आहे.

सदरची तक्रार माझे सांगण्याप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असून ते प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिली, ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

ही फिर्याद दिली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

VIKAS SHEKUJI PATIL(I (Inspector)) / POBN62686 or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
कामाले

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)
दिगांबर पांडुरंग पाटील
**Name** (नाव): VIKAS SHEKUJI PATIL
पोलीस उपनिरीक्षक
**Rank**(पद): (Inspector)
पो.स्टे. भोकर
**No.**(सं.): POBN62686



Scanned with CamScanner